संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

**विद्यापीठात बिंदूनामावली प्राथमिक तपासणी विशेष शिबीराचे १४ ते २० जानेवारी दरम्यान आयोजन**

**बिंदू नामावली तपासून घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाच्यावतीने दि. १४ ते २० जानेवारी, २०१९ दरम्यान शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय/शिक्षकेत्तर पदांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी तात्काळ करून घेण्याबाबत विशेष शिबीराचे आयोजन विद्यापीठ परिसरातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या सभागृहात करण्यात आले आहे.

विद्यापीठाशी संलग्नित संस्था/महाविद्यालयातील शिक्षकीय/शिक्षकेत्तर संवर्गाची बिंदूनामावली नुकत्याच प्राप्त झालेल्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून दिलेल्या दिनांक १.१०.२०१७ रोजीच्या पदनिश्चितीन्वये सुधारीत बिंदूनामावली तयार करून बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी विद्यापीठ मागासवर्ग कक्षाकडून आणि अंतिम तपासणी सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून प्रमाणिकरण झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तात्काळ करावयाची आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षकेत्तर संवर्गाची सुधारीत बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करण्याकरिता विशेष शिबीराचे अमरावती जिल्ह्यासाठी दि. १४ व १५ जानेवारी, अकोला व बुलढाणा जिल्ह्यासाठी दि. १७ व १८ जानेवारी आणि वाशिम व यवतमाळ जिल्ह्यासाठी १९ व २० जानेवारी रोजी आयोजन विद्यापीठ परिसरात करण्यात आले आहे. त्यानुसार अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्याकरिता गोषवाऱ्यानुषंगिक विहित प्रपत्रामध्ये माहिती देवून, प्रत्येकी दोन नविन बिंदूनामावली नोंदवहीसह सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचे दिनांक १.१०.२०१७ रोजीचे पदनिश्चितीचे पत्र व त्यानुषंगिक आवश्यक दस्ताऐवज नमूद परिशिष्ट १ नुसार विद्यापीठ मागासवर्ग कक्षास सादर करून, सुधारीत बिंदूनामावली तपासणीची कार्यवाही करावी असे विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाचे उपकुलसचिव डॉ. डी. आर. चव्हाण यांनी कळविले आहे. सर्व संबंधितांना याची नोंद घ्यावी व आपले बिंदूनामावली तपासून घ्यावी असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. ११/०१/२०१९.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी